# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २०/१०/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :- अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील ईश्वरनगर भाग २ लधवे ले आउट उमरेड येथे दिनांक १९/१०/२०२२ चे २२.३० ते दिनांक २०/१०/२२ चे ०५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे- विकास रामचंद्र भावे, वय ४६ वर्ष, रा. ईश्वर नगर भाग २ लधवे ले आउट उमरेड यांचे राहते घर हे एकमजली असुन खाली ते परीवारासह राहतात व वरील मजल्यावर दोन किरायेदार १.किरण वंजारी रा कवडसी देश जि चंद्रपुर २.रामकृष्ण मारोती ढोक रा हेवती हे राहतात. दि. १९/१०/२२ चे सकाळी ०८.०० वा. रामकृष्ण ढोक हे नातलगाचे भेटीसाठी बाहेरगावी गेले होते. फिर्यादीची पत्नी उदासा येथे शिक्षिका असल्याने दोघेही कामावर गेले. सायं ०५.३० वा. परत येवुन जेवन खावन करून २२.३० वा.झोपले. दि.२०/१०/२०२२ चे सकाळी ०५.३० वा.नेहमी प्रमाणे शाळेत जाण्याकरिता उठले असता घरातील मास्टर बेडरूम मधील बेडवरील गादी अस्थाव्यस्थ फेकलेली दिसली. तसेच लाकडी आलमारीतले आतील कपाटातुन सामान कपडे अस्थ-व्यस्थ फेकुन दिसुन आले. स्वयंपाक घरातील दरवाज्याची कडी अज्ञात आरोपीने तोडून आत प्रवेश करून आलमारीमधील सोने-चांदीचे दागीने कि. १,५४,०००/-रू. व नगदी ८,५००/-रू. असा एकुण कि. १,६३,०००/-रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे. अज्ञात आरोपीने तसेच किरायेदार रामकृष्ण ढोक यांचे घराचे दाराचे कुलुप तोडून लोखंडी कपाटातुन सोन्या-चांदीचे दागिने कि ४१,५००/-रू. व ६,०००/-रू रोख रक्कम असा एकुण कि. ४७,५००/-रू. चा माल चोरी गेला. फिर्यादीचे व किरायदार यांचे घरातुन एकुण २,१०,५००/-रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने दरवाज्याचा कडी कोंडा तोडुन दागदागीने व रोख रक्कम चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपोनि बट्टुलाल पांडे मो.क्र. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. सावनेर** :- अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील कमाले वाईन शॉप जवळ सावनेर येथे दिनांक १९/१०/२२ चे १५.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे- विठोबा श्यामराव गमे, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ केळवद ता. सावनेर हे एसबीआय बॅंक सावनेर येथुन २,००,०००/-रू. विड्राल करून एमएच- ४०/बीडी-२७९० क्रमांकाच्या ॲक्टीवा गाडीचे डिकीत २,००,०००/-रू. तसेच पासबुक व चेकबुक थैलीसह ठेवुन राजकमल चौकात देशी दारू चे दुकाना समोर उभी करून देशी दारू घेण्याकरीता गेला होता. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे ॲक्टीवा गाडीचे डिक्कीतुन ५००/-रू. चे ३०० नोटा एकुण १,५०,०००/-रू. तसेच ५० रू चे १,०००/-रू. नोटा असे ५०,०००/-रू. असे एकुण २,००,०००/-रू. तसेच पासबुक व चेकबुक थैलीसह चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा गोवारी येथे दिनांक १९/१०/२०२२ चे ००.३५ वा. दरम्यान विना क्रमांकाचा आयसर ट्रॅक्टरचा चालक नामे— राहुल धनराज ठवकर, वय २६ वर्ष, रा. कोटगाव याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १ ब्रास रेती कि. ४,०००/—रू. ची भरून वाहतुक करतांनी मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली किमती ३,००,०००/—रू. व १ ब्रास रेती असा एकुण कि. ३,०४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना प्रविण जावरकर पो स्टे मौदा यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि रोशन शिंदे मो.क्र. ९५५२५५६८६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**